# महागाई

रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# महागाई

एक आहे सावत्र आई, नाव तिचे महागाई
खाउ का ठेउ याची तिला नेहमीच घाई ॥धृ॥

भाजी घेण्या मंडईत गेलो, मेथीच्या भाजीचा भाव विचारता झालो
पाच रूपयाची जुडी ऐकून गारच झालो
भाजी वाल्याशी भाव करित म्हणालो
मागील आठवडयात पाच रूपयास दोन होत्या
किमान चार रूपयास एक तरी देना ?
भाजी वाला बोलता झाला, सायेब तो जमाना गेला
महागाई लई वाढलिया, त्येल तुप महागलंय, पेट्रोल भडकलंय
तीन रूपडे आमची खरेदी हाय, एक रूपया गाडीभाड लागतंय
आठ आणे पंचायतीचा कर हाय, आठ आणे पोटासाठी मागतुया
खर तेच सांगतो सायेब पाच रूपयासबी परवडत न्हाय
सांजच्याला सहा रूपये दिउ नबी भेटणार न्हाय ॥१॥

कापड घेण्या सिंध्याच्या दुकानी गेलो
भाव ऐकून थंडाच पडलो
सिंधी व्यापारी भाषा बोलू लागला
साब कपडा देखो, कपडे का नूर देखो
बढीया कपडा सस्ता दाम, ग्राहकका फायदा यही मेरा इनाम
मनुष्य स्वभावे भाव करू लागलो
मागील उदाहरणे देत घासाघीस करू लागलो
सिंधी तो सिंधी चातुर्याची शिकस्त केली

शेअर मार्केट गिर गया, सोना आसमान को भीड गया
महागाइची कारणे देत महागडे कापड माझे गळयात मारली ॥२॥

गोष्ट ती नवलाइची, महागाई नामक सावत्र आईची
घोळात घोळ मोठाघोळ व्यापाराचा बट्टयाबोळ
दुकानदार असो, वा व्यापारी, वा असो नोकरदार
जो तो गातो एकच रडगाणे, वाजवित असतो महागाइचे तुणतुणे
दुकान चालेना, धंदा होइना, महागाइमुळे काही परवडेना
तरी पण जनसामान्य जगतच आहे, सावत्र आईचा त्रास सहतच आहे
अशा या जगण्या अंत नाही,अन् कुणाला खंत नाही ॥३॥